# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** वाशिम

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0351 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/06/2024 22:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 05/06/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/06/2024
**Time From (वेळेपासून):** 14:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/06/2024 **Time (वेळ):** 21:41 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 072

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/06/2024 22:41 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा सामान्य रूग्णालय वाशिम

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.समाधान परबती खोडके

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1974

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दत्तनगर लाखाळा वाशिम,वाशिम,वाशिम,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | दत्तनगर लाखाळा वाशिम,वाशिम,वाशिम,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री सचिन शिवाजीराव बांगर | | | 1. बेलदारपुरा ,पोळा मारोती जवळ हिंगोली,हिंगोली,हिंगोली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पो.स्टे.वाशिम शहर
दिनांक:- 05/06/2024

नाव- श्री.समाधान परबती खोडके वय 50 वर्ष, व्यवसाय -शिक्षक,श्री बाकलीवाल उच्च माध्य.विद्यालय वाशिम. रा. दत्तनगर लाखाळा वाशिम. मो.नं.9527040190.

मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो व श्री बाकलीवाल उच्च माध्य.विद्यालय वाशिम येथे शिक्षक म्हणुन नोकरी करतो, दिनांक 05/06/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम कार्यालयात जावून पोलीस उपअधिक्षक श्री गजानन शेळके यांचे कडे लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे.

"मी समक्ष येऊन तक्रार देत आहे की, मी वरील ठिकाणी कुटंबासह राहत असुन श्री बाकलीवाल उच्च माध्य. विद्यालय वाशिम येथे शिक्षक म्हणुन कार्यरत आहे.

माझी पत्नि सौ स्वाती समाधान खोडके हीचे कलावती हॉंस्पीटल अकोला येथे दि.08/04/2024 रोजी गर्भपीशवीचे आॅपरेशन झाले होते. सदर आॅपरेशन हे प्रायव्हेट हॉंस्पीटल मध्ये झाल्याने संपुर्ण खर्च मी स्वतः केला आहे. यासंबधाने मी माझ्या पत्नि चे वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक तयार करुन जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे दि. 03/06/2024 रोजी गेलो असता तेथे मला बांगर साहेब भेटले. त्यांनी माझी वैदयकिय देयकाची फाईलची तपासणी केली,सदरची फाईल तपासणी केली असता त्यांनी मला 3000/- रु ची मागणी केली. व आवक/जावक विभागात सदरची फाईल जमा करण्यास सांगीतले. मी त्यांना नाईलाजास्तव हो म्हणुन तेथुन निघालो. आवक/जावक विभागामध्ये लंच टाईम असल्याने तेथे कोणीही हजर नसल्याने मी थोडावेळ वाट बघुन निघुन गेलो. त्यानंतर काल दि.04/06/2024 रोजी मी सदरची वैद्यकीय देयकाची फाईल मी आवक/जावक विभागामध्ये दिली व ओ.सी. फाईल वर रिसीव्ह करुन घेतली आहे. मी आवक जावक विभागात बांगर साहेब यांचे बद्दल विचारणा केली असता तेथील कर्मचारी यांनी मला सांगीतले की आज ते नाहीत उदया या. असे सांगीतल्याने मी तेथुन निघुन आलो. परंतु बांगर साहेब यांनी मला माझे पत्नि नामे सौ स्वाती समाधान खोडके यांचेवर झालेल्या उपचाराची वैद्यकीय देयक पडताळुन सही शिक्का देण्याकरीता लाचेची मागणी केली आहे. मला माहिती आहे की वैद्यकीय देयक पडताळुन सही शिक्का देण्यासाठी पैसे देण्याची आवश्यकता नाही.

बांगर साहेब.जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दुश्मनी नाही त्यांना माझी पैसे देण्याची इच्छा नाही. बांगर साहेब,जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांच्यावर कारवाई करावी या करीता तक्रार देत आहे. आज दि.04/06/2024 रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे माझे पत्निचे वैद्यकीय बील सादर केलेल्या सदर अर्जाची झेराक्स प्रत मी या तक्रारीसोबत देत आहे. कारवाई होण्यास विनंती आहे."

मी वरील प्रमाणे लेखी तक्रार दिली. पोउपअधि गजानन शेळके यांनी मा.उपवनसंरक्षक(प्रादे.) वाशिम वनविभाग वाशिम येथुन दोन पंच कर्मचारी उपलब्ध करुन घेतले. मी, दोन्ही पंच कर्मचारी यांच्या समक्ष माझी तक्रार सांगुन वरीलप्रमाणे लेखी तक्रार स्व हस्ताक्षरात हजर असलेले दोन्ही पंच व पोउपअधि गजानन शेळके यांच्या समक्ष लीहुन दिली आहे.

लोकसेवक श्री सचिन शिवाजीराव बांगर वय-39 वर्शे व्यवसाय-नोकरी, कार्यालय अधिक्षक,जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांची प्रत्यक्ष भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावी लागेल असे पोउपअधि गजानन शेळके यांनी मला सांगितले. लोकसेवक श्री सचिन शिवाजीराव बांगर यांचे सोबत माझी जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम जिल्हा वाशिम येथे भेट होणार असल्याने पोलीस उपअधिक्षक गजानन शेळके, दोन्ही पंच, लाप्रवि स्टाफ व मी असे आम्ही

लाप्रवि कार्यालय वाशिम येथे हजर असतांना पोउपअधि गजानन शेळके यांनी पडताळणी कारवाई संबंधी सर्वांना सुचना दिल्या.

सदर तक्रारीवरुन आज दि.05/06/2024 रोजी मला, व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देऊन पंच क्र.1 यांचेसह लोकसेवक श्री सचिन शिवाजीराव बांगर यांची भेट घेवून त्यांची पडताळणी करणेकरीता पाठवून पंचासमक्ष पडताळणी केली.

पडताळणी दरम्यान लोकसेवक हयांनी जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथील त्याचे कक्षा मध्ये भेट झाली असता त्यांनी मला माझ्या पत्नीचे मेडीकल बिल पडताळणी करुन सही शिक्का देण्या करीता 3,000 रुपये लाचेची मागणी समोरील कागदावर 3 असा आकडा लिहुन केली, मी त्यांना 3000 रुपये जास्त होतात कमी करा असे म्हटले असता त्यांनी थोडे संभाषण करुन पाचशे रुपये कमी दया असे म्हणुन लाचेच्या स्वरुपात 2,500 रुपये लाचेची मागणी केली व पैसे आजच दया असे सांगीतले त्यावर मी त्यांना उदया पैसे देतो म्हटले असता त्यांनी आजच पैसे देण्याचा आग्रह केला. त्यांना लगेच आणुन देतो असे म्हणुन पंचा सह परत लाप्रवि ऑफिस वाशिम येथे येवून हया बाबत पोलीस उपअधिक्षक गजानन शेळके हयांना काय बोलणे झाले ते सांगीतले असता त्यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण आजच सापळा कारवाई करावी लागेल असे सांगुण मला, श्री सचिन शिवाजीराव बांगर यांना लाच म्हणुन देण्याकरीता 2,500/-रूपये रक्कम हजर करण्यास सांगितले असता मी 500/-रूपये दराच्या 5 नोटा, असे एकुण 2,500/-रूपये हजर केले.

श्री सचिन शिवाजीराव बांगर यांना लाच म्हणुन दयायचे रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. पोउपअधि गजानन शेळके यांनी सापळा कार्यवाही संबंधी सर्वांना सुचना दिल्या. अँल्ट्राव्हायोलेट लॅम्पचा प्रयोग करून दाखविले. त्यांनतर 14.35 वा दरम्यान परत व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र.1 यांचे सह मला श्री सचिन शिवाजीराव बांगर यांना लाच रक्कम देण्याकरीता जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम जिल्हा वाशिम येथे पाठविले. त्याप्रमाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या इमारतीमध्ये पंचासमक्ष सापळा कारवाई आयोजीत करण्यात आली. जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथील लोकसेवक श्री बांगर यांच्या कक्षा मध्ये त्याचेत व माझे मध्ये संभाषण झाले. श्री सचिन शिवाजीराव बांगर यांनी मला काय गुरुजी असे म्हटले असता मी त्यांना अडीच हजार रूपये आहेत माझ मेडीकल बील उदया करा बर साहेब असे म्हटल्यावर त्यावर उदया चार पाच वाजता नक्की घेवुन जा असे म्हणुन माझे कडुन लाचेची रक्कम 2,500/-रुपये स्विकारुन माझे मेडीकल बिल च्या फाईल मध्ये ठेवले मी पोउपअधि गजानन शेळके यांना फोन व्दारे मिसकॉल करुन लाच रक्कम स्विकारल्याबाबतचा पुर्व नियोजित इशारा केला. पोउपअधि गजानन षशेळके व स्टाफ यांनी येऊन श्री सचिन शिवाजीराव बांगर यांचे कडून लाचेची रक्कम पंचासमक्ष जप्त करुन त्यांना ताब्यात घेतले.

श्री सचिन शिवाजीराव बांगर वय-39 वर्ष व्यवसाय-नोकरी, कार्यालय अधिक्षक,जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांनी आज दिनांक 05/06/2024 रोजी मला माझी पत्नी नामे सौ.स्वाती समाधान खोडके यांचेवर झालेल्या उपचाराची वैद्यकीय देयक पडताळुन सही शिक्का देण्याकरीता 3,000 रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 2,500/-रु स्विकारण्याची तयारी दर्शवुन सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे त्यांच्या कक्षामध्ये अंदाजे 14.35 वा ते 14.45 वा. दरम्यान स्वतः 2,500/- रुपये लाच रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद पो.हवा.विनोद मारकंडे यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचून पाहली, माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.अशा फिच्या जबानीरिपार्ट सदरचा गुन्हा दाखल करुन पुढील तपास मे.पोनी सा यांचे आदेशाने पोउपअधि गजानन शेळके ला.प्र,वाशिम यांचेकडे देण्यात आला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
Puspalata Subhas Wagh
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** DCPS151010004
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant. (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Bhodke

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

स्टे.डा.अमलदार
पो.स्टे.वाशिम (शहर)

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Devendrasinh Bahac
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**